# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४५
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

दिनांक : 22 डिसेंबर 1998.

जाक्र.मजीप्रा/सस/आ–4/

विषय : प्राधिकरणाच्या दि. 17.9.98 रोजी झालेल्या 81 व्या सभेचे इतिवृत्त.

प्राधिकरणाच्या दिनांक 17.9.1998 रोजीं झालेल्या 81 व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन खालिलप्रमाणे निर्णय घेण्यांत आले. या सर्व सभेचे कार्यक्रम बाबवार इतिवृत्त खालीलप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

(जे.एस.साहनी)
सदस्य सचिव (प्रशासन)

अ.मु.स., प्रा.पु. व स्व.विभाग,मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

चालू आहे काय अशी विचारणा केली. त्यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांना माहिती दिली की, प्रा...

# दिनांक १७ सप्टेंबर १९९८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८१ व्या बैठकीचे इतिवृत्त:-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८१ वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष मा.अण्णासाहेब डांगे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ सप्टेंबर १९९८ रोजी झाली. या बैठकीस खालील सदस्य व निमंत्रित अुपस्थित होते :-

१) मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अुपाध्यक्ष.
३) श्री.व्ही.रंगनाथन, अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सदस्य
४) श्री.भानुदास पडळकर, सदस्य
५) श्री.आशिष कुलकर्णी, सदस्य
६) श्री.माधव कुलकर्णी, सदस्य
७) श्री.आदिनाथ नवलेपाटील, सदस्य
८) श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य.
९) श्री.राजेंद्र सिंग,प्रधान सचिव, वित्त विभाग,
१०) श्री. नंदलाल, प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग
११) श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१२) श्री.जे.एस्.साहनी,सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी ''विशेष निमंत्रित'' म्हणून उपस्थित होते :-

१) श्री.नि.कृ.माडा,मुख्य प्रशासकीय अधिकारी
२) श्री.भा.आ.डोंगरे,वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी
३) श्री.एस.डी.अरमाळ,मुख्य अभियंता, ठाणे
४) श्री.एस.व्ही.शेळकीकर, मुख्य अभियंता,पुणे
५) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य)
६) श्री.मिलिंद केळकर,अधीक्षक अभियंता(समन्वय)

**कार्यक्रम बाब क्र.१:- प्राधिकरणाच्या ८० व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

प्राधिकरणाच्या ८० व्या इतिवृत्तावर कोणाच्याही सूचना वा आक्षेप प्राप्त झाले नसल्याने व या बैठकीत यावर कोणीही काही न बोलल्याने इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:- परिशिष्ट क्र.१:७९ व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेली कृती.**
**परिशिष्ट क्र.२:८० व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेली कृती.**

सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी अशी माहिती दिली की, ७९ वी बैठक झाल्यानंतर लगेचच दोन आठवडयांनी८० वी सभा झाल्याने ७९ व्या सभेत घेतलेल्या निर्णयाबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती ८० व्या सभेत ठेवता आली नाही आणि म्हणून ७९ व ८० या दोन्ही सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती या बैठकीत मांडण्यात आली आहे.

**७९ व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेली कृती**

७९ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात अपर मुख्य सचिवांनी अनु क्र. १४(निदानोपयोगी अभ्यास) या संदर्भात पुढे काय कार्यवाही झाली आणि अभ्यासाचे हे काम वेळापत्रकानुसार चालू आहे काय अशी विचारणा केली. त्यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी माहिती दिली की, प्रा.डॉ.लक्ष्मीपती व

त्यांच्या सहका-यांनी पुणे येथे ३ दिवसांची एक कार्यशाळा आयोजिली होती. तद्नंतर पुढील पाऊले टाकण्यात येत आहेत. तरीही, हे काम वेळापत्रकानुसार होत आहे ना इकडे लक्ष देण्याच्या सूचना अपर मुख्य सचिवांनी केल्या.

<u>८० व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेली कृती</u>

अनु क्र.१ मीरा-भाईंदर पाणी पुरवठा योजना-सुरेंद्र इंजिनिअरींग कंपनी यांची निविदा- सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी विचारणा केली की, निविदांवर विचार होताना राज्यमंत्री महोदयांनी सुरेंद्र इंजिनिअरींग या ठेकेदारांकडून राज्यात इतरत्र जी कामे हाती घेण्यात आली आहेत त्याबाबतचा अहवाल मागविला होता. त्यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे ? हा अहवाल या बैठकीत सादर करण्यात आला आहे अशी माहिती देण्यात आली.

श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा मुद्दा मांडला की, त्यांच्या माहितीनुसार, या ठेकेदाराकडून कार्यान्वित होत असलेल्या सर्व योजना समाविष्ट झाल्या नसाव्यात.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी, यांनी असे दाखवून दिले की, आता सादर केलेल्या अहवालानुसार या ठेकेदारांने हाती घेतलेल्या अनेक कामांमध्ये त्यांच्यकडून विलंब झालेला आहे आणि त्यांना दंडही लावण्यात आला आहे. खास करुन, न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजनेबाबत त्यांनी उल्लेख केला.

कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी अशी माहिती दिली की, मीरा भायंदरच्या कामाच्या निविदांवर विचार होत असताना दोन्ही गटातील कामांच्या निविदा हे ठेकेदार १७.२२% कमी दराने करावयास तयार असतील तरच दोन्ही गटाच्या निविदा स्वीकारुन ही दोन्ही कामे त्यांच्यावर सोपविण्यात यावी असे ठरले होते.त्याप्रमाणे ठेकेदाराने आपली संमती दिली व निविदा स्वीकारुन कार्यादेश देण्यात आले आहेत व राज्यमंत्री महोदयांनी मागविलेली माहिती आज सादर करण्यात आली आहे.

या कंत्राटदाराने हाती घेतलेल्या अनेक कामांना विलंब झाला आहे यावर प्रधान सचिव, नगर विकास यांनी भर दिला. राज्यमंत्री महोदयांनी असे स्पष्ट केले की, या ठेकेदारांबद्दल तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारीनुसार कंत्राटदाराची कार्यपध्दती अशी की, एका मागून एक कामे घ्यायची, ती स्वत:ला हवी तशी करावयाची, उशीर करावयाचा आणि मग एस्कलेशन मागायचे . राज्यात इतरत्र जी कामे सोपविण्यात आली आहेत त्यातील निविदेप्रमाणे मूळ खर्च किती होता व प्रत्यक्षात किती खर्च झाला याची माहिती घेतल्यास त्यांना एस्कलेशन वगैरे देण्यात आले आहे की, नाही हे उघड होईल. त्यांनी मुद्याम हेही स्पष्ट केले की, पूर्ण विचारांती ते हा मुद्दा मांडत आहेत.

सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी असा खुलासा केला की, या कामाची अंतीम देयके झाल्यावरच याबाबत निश्चितपणे काही सांगता येईल. अपर मुख्य सचिवांनी असेही स्पष्ट केले की, विविध कारणांनी कंत्राटदारांना मुदतवाढ दिली जाते. यामध्ये विलंबास कंत्राटदार जबाबदार नसेल व प्राधिकरण जबाबदार असेल तर अशा प्रकरणी एस्कलेशन दयावे लागते.

मा.मंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, याबाबत मोघम चर्चा होणे इष्ट नाही. ठेकेदार वेळ काढूपणा करीत आहे काय हे पाहणे महत्वाचे आहे. इचलकरंजीच्या संदर्भात संबंधित मुख्य अभियंत्यांनीच याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक होते असेही ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी पुढे अशीही माहिती दिली की, हे काम सुरु होत असताना सुरुवातीस नगरपलिकेत एक बॉडी होती, तिने तो प्रस्ताव मान्य केला. नंतर बॉडी बदलली व त्यांनी प्रस्ताव अमान्य केला. मागाहून पुन्हा: हा प्रस्ताव मान्य करण्यात आला, असे बदल झाले आणि वाद झाला तसेच अडचणी आल्या व विरोध पण झाला. या घडामोडी समजून घेणे आवश्यक आहे. आता इचलकरंजीच्या कामात बरीच प्रगती झालेली आहे असे पुण्याच्या मुख्य अभियंत्यांनी माहिती दिली.

मा.मंत्री महोदयांनी पुन्हा: स्पष्ट केले की, या निविदेचे काम रद्द करावे अशाच त्यांच्या सूचना होत्या तथापि, त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही. गैबी बोगदयाचे काम झाले की, काळम्मावाडी धरणात साठलेले दूधगंगेचे पाणी भोगावती-पंचगंगेत येऊ शकते आणि मग इचलकरंजीला पाण्याचा कुठलाही त्रास होणार नाही असा हा विचार होता. आणि आता हीच परिस्थिती आहे व इचलकरंजीला गेल्या वर्षी पाण्याची कोणतीही टंचाई भासली नाही आणि प्रदूषणाचा कोणताही त्रास झाला नाही असे असताना कृष्णेहून १८ कि.मी.वरुन पाणी आणण्याची योजना करुन काय

होणार ? प्रदूषणाच्या प्रश्नामुळे या योजनेचा विचार झाला, पण वारणा नदीचे पाणी आणावयाचे झाल्यास कमी प्रदूषण , अंतर कमी एवढेच नव्हेतर वाटेवरच्या कुंभोज-बाहुबली इत्यादी ७ गावांचा समावेश करुन, योजना आखता आली असती पण तसे झाले नाही.

चर्चेच्या ओघाने मा.मंत्री महोदयांनी असाही अभिप्राय व्यक्त केला की, बृहत आराखडयामध्ये ज्या योजना समाविष्ट करण्यात आल्या त्या संदर्भात काही निर्णय घेण्यात आले, आदेश काढले गेले. पण या सा-यांचा विविध स्तरावर क्षेत्रीय अधिकारी आपल्याला हवा तसा अर्थ लावून किंवा आदेशामागचा हेतू आणि तारतम्य ध्यानांत न घेता गैरउपयोग करतात. असे प्रकार वेळच्यावेळी कसे शोधून काढावे आणि त्यावर कसे नियंत्रण ठेवावे याचाही गांभीर्याने विचार होण्याच्या आवश्यकतेवर या त्यांनी भर दिला. या संदर्भात सांगली जिल्हयात अलीकडे त्यांच्या निदर्शनास आलेल्या एका बाबीचाही मा.मंत्री महोदयांनी उल्लेख केला.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी असा मुद्दा मांडला की, मे.सुरेंद्र इंजिनिअरींग यांच्या दोन्ही निविदा स्वीकारण्याचा जेंव्हा विचार केला तेंव्हा संबंधित अधिका-यांनी या ठेकेदाराबद्दलची सर्व माहिती त्याच वेळी मांडायला हवी होती आणि मग काम दयायचे की नाही हे ठरवावयास हवे होते.

मा.राज्यमंत्री महोदयांनी अशी माहिती दिली की, याच सुमारास त्यांनी कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे या कंत्राटदाराबद्दल चौकशी केली होती आणि मुख्यत: अभियंत्यांनी ते चांगले कंत्राटदार आहेत, कामाची प्रगती चांगली असते ,काम वेळेवर करतात असे सांगितले होते. त्यावर कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी असा खुलासा केला की, त्यांच्या अखत्यारितील न्हावा-शेवा,टप्पा-३ प्रकल्पाचे काम वगळता इतर कामाबद्दलचा अनुभव चांगला आहे असे मा.मंत्री महोदयांना कळविले होते. त्यावर राज्यमंत्री महोदयांनी अशीही सूचना केली की, कोणत्याही कंत्राटदारावर मेहेरनजर दाखविण्याचे काहीही कारण नाही. जर एखादा कंत्राटदार काम चांगले करीत नसेल, वेळेवर करीत नसेल तर त्याच्याकडून काम काढून घेऊन त्यांना पुन्हा: काम दिले जाणार नाही अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. किंबहुना इतर राज्याच्या तुलनेत आपण कंत्राटदारांच्याबाबत सौम्य दृष्टीकोन बाळगतो यावर त्यांनी भर दिला. शासनाचा पैसा, शासनाचे काम याबाबत अधिक काटेकोरपणे विचार होऊन निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधान सचिव, नगर विकास यांनी दिग्रस योजनेबद्दल माहिती का आली नाही अशी विचारणा करुन, एवढा वेळ होऊन गेला असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात काही अडचण यावयास नको होती असेही स्पष्ट केले.

त्या वेळी जी पार्श्वभूमी होती ती लक्षात घेऊन या ठेकेदारांना काम दिले. तेंव्हा ते काम आता रद्द करावयाचे का या बाबीचाही विचार व्हावा असे मा.मंत्री महोदयांनी सुचविले. त्यावर अपर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, एकदा निविदा स्वीकारुन कार्यादेश दिल्यावर, त्यानंतर काम रद्द करणे योग्य होणार नाही. त्यावर मा.मंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, कमीत-कमी खर्चाच्या निविदा स्वीकारणे हा निकष लावून ही निविदा स्वीकारण्यात आली आहे आणि तेंव्हा यापुढे अशा कंत्राटदारांना काम दयायचे की, नाही याचाही निर्णय करावा लागेल. आता अंतीमत: काम दिले गेले असेल तर काही प्रश्न नाही पण, आधी काम घ्यायचे आणि नंतर ते रेंगाळत ठेवायचे हे अयोग्य आहे असाही मुद्दा मांडला गेला.

कामे अर्धवट ठेवणा-यां कंत्राटदारांना काम न देणे अशा प्रकारची कार्यवाही करावयाची झाल्यास निविदा देण्यापूर्वी कंत्राटदारांची पूर्वअर्हता ठरवावयाच्या टप्प्यावरच अशा कंत्राटदारांना नकार देणे श्रेयस्कर राहील असा मुद्दा कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी मांडला. त्यावर अपर मुख्य सचिवांनी अशा सूचना केल्या की, याबाबतचा विचार करुन, प्राधिकरणाने एक परिपत्रक काढून त्याव्दारे असे आदेश द्यावे की, अशा त-हेने निविदासंच देण्यापूर्वी त्या कंत्राटदारांकडे असलेल्या सर्व कामांची माहिती नीट तपासून घ्यावी आणि जोवर याबाबत स्वत:चे समाधान होत नाही तोवर त्या कामापुरती त्या ठेकेदाराची पूर्वअर्हता मान्य करु नये.

अशा त-हेची माहिती पहिल्या लिफाफ्यात मागविली जावी आणि तो लिफाफा उघडून त्याबाबतची सर्व पूर्तता झाल्यावरच दुसरा लिफाफा उघडण्यात यावा असा मुद्दा मांडण्यात आला.

अशा प्रकारचा विचार करुन आजवर किती कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात आली अशी मा.राज्यमंत्री महोदयांनी विचारणा केली. त्यावर आपल्या माहितीतुसार कोयना प्रिस्टेस्ड कंपनीच्याबाबत बार्शी व धुळे येथील कामाबाबत कार्यवाही करण्यात आल्याचे कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी सांगितले. त्यावर सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असे ध्यानांत आणून दिले की, असे असले तरी, कोयना प्रिस्टेस्ड पाइप कंपनीकडून येणे असलेली रकम वसुल होत नाही. तसे असेल तर अशा प्रकरणी पहिल्या कंत्राटदाराच्या जोखमीवर व खर्चाने काम करुन घेण्याची जी पध्दत आहे त्याचा अवलंब का करुन घेतला जात नाही अशी विचारणा मा.राज्यमंत्री महोदयांनी केला.

कार्यवाही
मु.प्र.अ.

या चर्चेच्या संदर्भात सदस्य श्री.माधव कुलकर्णी,यांनी पुणे विभागांत एक निविदा उघडणेबाबत वरून फोन आला आणि मग निविदा उघडली गेली असा उल्लेख केला. या संदर्भात अपर मुख्य सचिवांनी यांनी सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांना सूचना केल्या की, त्यांनी या संदर्भात संबंधित मुख्य अभियंत्यांकडून गोपनीय अहवाल मागवून तो मा.मंत्री महोदयांना सादर करावा.

कार्यवाही
अ.अ.(समन्वय)

या अनुषंगाने श्री.माधव कुलकर्णी,यांनी वृत्तपत्रातील एका बातमीचा हवाला देत श्री.सूर्यप्रकाश राव नावाच्या एका कंत्राटदाराचे काम अशा त-हेनेच असमाधानकारक असताना त्यांना पुन्हा: ७ कोटी रुपये किंमतीचे काम देण्यात आले अशी बातमी आल्याचे ध्यानांत आणून दिले. तथापि, या बातमीमध्ये या कंत्राटदाराची कोणत्या कामाची निविदा स्वीकारण्यात आली याचा स्पष्ट निर्देश नसल्याने माहिती देणे कठीण आहे असे सांगण्यात आले. त्यावर याबाबतची माहिती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी अशी प्रधान सचिव, नगर विकास यांनी सूचना केली.

याबाबतच्या चर्चेनंतर मा.राज्यमंत्री महोदयांनी अशी सूचना केली की, कंत्राटदारांकडे एका वेळी अनेक कामे असतील आणि त्यांची प्रगती समाधानकारक नसेल तर ती सर्व कामे समाधानकारकरित्या पूर्ण होईपर्यंत त्या कंत्राटदाराला नवीन काम देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात यावा. मा.राज्यमंत्री महोदयांनी केलेल्या सूचनेनुसार सध्या आपल्याकडे काही पध्दत अस्तित्वात आहे का, अशी विचारणा अपर मुख्य सचिवांनी केली. त्यावर सदस्य सचिव(तां) यांनी खुलासा केला की, सध्या बिड कपॅसिटीबाबत जे परिपत्रक आहे त्यानुसार कार्यवाही होते. त्यातील तरतुदीनुसार कंत्राटदार बसत नसेल तर नवीन काम दिले जात नाही.

अपर मुख्य सचिवांनी पुन्हा: अशी विचारणा केली की, हा विचार करताना संपूर्ण माहिती उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याने प्रत्येक मुख्य अभियंता आपापल्या विभागापुरते पाहण्याची शक्यता आहे. याबाबत एकदा या विषयावर चर्चा झाली होती आणि एकाच बिड कपॅसिटीच्या आधारे एकाच वेळी सर्वत्र कामे दिली गेली तर गोंधळ उडण्याची शक्यता आहे आणि त्यावर लक्ष ठेवणे कठीण जाईल म्हणून असे ठरले होते की, एका बाजूला कंत्राटदाराला किती काम दिले ही माहिती त्या-त्या मुख्य अभियंत्यांनी इतर मुख्य अभियंत्यांना कळवावी. तर दुसरीकडे जो कंत्राटदार निविदा भरतो त्याने बिड कपॅसिटीच्या संदर्भात आपल्या किती निविदा स्वीकारल्या आहेत व किती निविदा विचाराधीन आहेत ही माहिती देणे बंधनकारक करावे. अर्थात या संदर्भात चुकीची वा खोटी माहिती दिली गेल्यास याबाबत कार्यवाही करण्याची तरतूदही करावी लागेल. अशा त-हेचे आदेश काढण्यात यावेत असे पूर्वीच ठरल्याचे त्यांना स्मरते असे त्यांनी सांगितले. असे आदेश काढलेले आहेत असे सदस्य सचिव(तांत्रिक) हयांनी सांगितले.

किती ठिकाणी निविदा भरण्यात आल्या, किती ठिकाणी कामे मिळाली आदी माहिती निविदा भरताना देण्याबाबतची काही तरतूद नाही काय, अशी विचारणा मा.मंत्री महोदयांनी केली. एका कंत्राटदाराकडे किती कामे सोपविण्यात यावी याबाबत अद्यापही ठरले नाही. हे ठरविण्याबाबत विचार चालू आहे पण त्यात काही अडचणीही आहेत अशी माहिती सदस्य सचिव(तां) यांनी दिली. त्यावर सदस्य श्री.सुरेश पटवर्धन आणि वित्त विभागाचे प्रधान सचिव(व्यय) यांनी सूचना केल्या की, तसे असेल तर काही नेमका प्रस्ताव सदस्य सचिवांनी प्राधिकरणापुढे ठेवावा.

कामांच्या संख्येवर बंधन घालताना काय अडचणी येऊ शकतील याचे एका टोकाचे उदाहरण देण्यात आले की. बिड कपॅसिटी जर ५ कोटी असेल आणि एखादया कंत्राटदाराकडे ५ कोटी रुपये किंमतीचे एकच काम असेल वा दुस-याकडे ५ लाख किंमतीची १०० कामे असतील तर या दोघांचीही बिड कपॅसिटी संपलेली असेल, पण त्या दोघांची तुलना योग्य होणार नाही.

अशा परिस्थितीत किती कामे एका कंत्राटदाराला देता येतील हे ठरविले जाणे आवश्यक आहे असे मत सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी व्यक्त केले.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी पुन्हा: एकदा आणखी एक उदाहरण देऊन कामाच्या संख्येवर बंधन घालण्याबाबत निर्णय घेण्यात यावा असे सुचविले. त्या संदर्भात त्यांची सूचना अशी होती की, एका वेळी ५ पेक्षा जास्त कामे देऊ नयेत असे ठरवावे आणि त्याच वेळी हातात असलेले काम जर ९०% वा त्याहून जास्त पूर्ण झालेले असेल तर ते काम विचारात घेऊ नये.

कदाचित बिड कपॅसिटी एवढयाच किंमतीचे एखादे मोठे काम निघण्याची शक्यता आहे असा मुद्दा सदस्य सचिव(तां) यांनी उपस्थित केला. मा.मंत्री महोदयांनी असे ध्यानांत आणून दिले की, जर बीड कपॅसिटीप्रमाणे कंत्राटदाराची पात्रता ठरविली जाणार असेल तर पक्का (Hard and Fast) नियम करणे कठीण जाईल. तेंव्हा कंत्राटदाराच्या कामाचा मागचा अनुभव काय हेही ध्यानांत घेणे आवश्यक आहे. असा विचार केला तरी, तो मोघम राहील आणि त्यातील संदिग्धता दूर होणार नाही असे मा.राज्यमंत्री महोदयांनी सुचविले. मग नेमके काय ठरवावे याबाबत सूचना करावी यावर मा.मंत्री महोदयांनी भर दिला.

प्रधान सचिव, नगर विकास, यांनी कामांसाठी आवश्यक त्या प्रमाणात उचित अशी स्पर्धा होणे अत्यंत आवश्यक आहे असे मत मांडले. तेंव्हा बिड कपॅसिटी हा निकष योग्य राहील असे मत मांडले. त्यावर कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी इतरत्र दोन्ही गोष्टी पाहिल्या जातात (बीड कपॅसिटी आणि कामांची संख्या) अशी त्यांची माहिती असल्याचे त्यांनी सांगितले.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन, यांनी असे ध्यानांत आणून दिले की, बिड कपॅसिटी ठरविण्याबाबत सूत्रातील आकडेवारीला पूर्वी २ ने गुणण्याची पध्दत होती. ती आता वाढून ३ ने गुणण्याचे ठरविले गेले असल्यामुळे कंत्राटदार जास्त कामे घेऊ शकतील अशी परस्पर व्यवस्था झाली आहे. अपर मुख्य सचिवांनी सूचना केली की, एका बाजूने बीड कपॅसिटी विचारात घ्यावी तर दुस-या बाजूने ५ हून जास्त कामे सोपवू नयेत असे ठरवावे लागेल. सदस्य श्री.सुरेश पटवर्धन, यांनी जो मुद्दा मांडला तो आपणास तितकासा पटत नाही असे सांगत सदस्य सचिव(तां) यांनी असे स्पष्ट केले की, पूर्वी बिड कपॅसिटी ठरवितांना पाईपसारखी सामुग्री मंडळातर्फे दिली जात असे. आता ही सामुग्री उपलब्ध करुन देण्याची (मुख्यत: ग्रामीण योजनांच्याबाबत) जबाबदारी निविदेतच समाविष्ट केली आहे. म्हणून २ ऐवजी ३ ने गुणण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यवाही
अ.अ. (समन्वय)

या बाबतचे निकष लक्षात ठरविणे आवश्यक आहे असे अपर मुख्य सचिवांनी ध्यानांत आणून दिल्यावर सदस्य सचिव(तां) यांनी स्पष्ट केले की, याबाबत सर्व मुख्य अभियंत्यांशी विचार विनिमय करुन ठरविण्यास काही कालावधी लागेल. तसे असल्यास ही माहिती निविदा समितीच्या पुढील बैठकीत म्हणजे दि.२९ सप्टेंबर १९९८ रोजी ठेवावी अशा सूचना अपर मुख्य सचिवांनी केल्या. अखेरीस असे ठरविण्यात आले की, सदस्य श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य श्री.माधव कुलकर्णी, सदस्य सचिव(तांत्रिक) या तिघांनी मिळून यावर एकत्रितरित्या विचार करून, याबाबतचा प्रस्ताव मांडावा.

कार्यवाही
अ.अ. (समन्वय)

मे.सुरेंद्र इंजिनिअरींग यांच्यावर जी कामे सोपविली आहेत त्याबाबत, निविदेतील मूळ किंमतीप्रमाणे अपेक्षित खर्च व प्रत्यक्षात झालेला खर्च (एस्कलेशन, एक्ट्रा आयटेम) या बाबींची माहिती पुढील बैठकीत सादर करण्यात येईल असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले.

<u>कार्यक्रम बाब क्र. ३ :- महा. जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.</u>

दि. ३ जून १९९८ रोजी झालेल्या महा.जीवन प्राधिकरणाच्या ८० व्या सभेत ठरल्याप्रमाणे महा. जीवन प्राधिकरणाच्या स्तरावर ज्या निविदा स्वीकृत करावयाच्या आहेत, त्यावर त्वरित निर्णय घेण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यांत आली. त्या समितीने आतापर्यत एकूण ६ निविदांवर चर्चा करुन त्यापैकी ५ निविदा स्वीकृत करण्याचा व एक निविदा अस्वीकृत करण्याचा निर्णय घेतल्याने सदस्य सचिव (तां.) यांनी सभेस सांगितले. स्वीकृत केलेल्या ५ व अस्वीकृत केलेल्या एका निविदेबाबत माहिती देणारा तक्ता देखील कार्यक्रम बाबी सोबत जोडला असल्याचे त्यांनी सांगितले.

सदर तक्त्याचे अवलोकन करुन श्री.माधव कुलकर्णी, सदस्य, महा.जीवन प्राधिकरण यांनी असे निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्राबाहेरच्या २ कंपन्या, म्हण.जेच मे.सुभाष प्रॉडक्टस, दिल्ली व मे.श्रीराम इंजिनीयरिंग कंपनी, चेन्नई यांनी निविदेसाठी दिलेले देकार हे अनुक्रमे २४.८९५ व ३२ टक्के कमी दराचे असल्याचे सांगून इतक्या कमी दरात या कंपन्या कामे करु शकणार आहेत, किंवा कसे, अशी शंका व्यक्त केली. मा.राज्यमंत्री तसेच मा.मंत्री यांनी असे सांगितले की, या दोन्ही कंपन्या अतिशय नावाजलेल्या कंपन्या असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कामासाठी त्यांनी प्रथमच निविदा भरलेली असल्याने कोणत्याही परिस्थितीत एकतरी काम मिळवायचेच असा विचार करुन त्यांनी निविदा दर भरलेले आहेत, असा खुलासा या दोन्ही कंपन्यांनी या निविदा स्वीकृतीच्या निर्णयाच्या आधी केलेल्या विचारणेवर केला आहे.

तरी देखील या दोन्ही कंपन्या या महाराष्ट्रा बाहेरच्या कंपन्या असल्याने आणि यापूर्वी भूकंपग्रस्त भागात हैद्राबाद येथील मे.एन.सूर्यप्रकाश राव या कंपनीने केलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेता, वरील दोन्ही कंपन्या बाहेरच्या ज्या राज्यातील आहेत तेथील यंत्रणांकडून त्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्यांत आलेले नाही ना, किंवा त्यांच्याबाबत ते कामेसोडून निघून जातात तशी तक्रार नाही ना, याची चौकशी करावी, व तसा अहवाल सादर करावा, असे मा.मंत्री महोदयांनी सूचित केले. त्याचप्रमाणे या दोन्ही कंपन्यांची कामे प्रत्यक्ष चालू झाल्यावर त्यांच्या कामावर सतत लक्ष ठेवण्याच्या सूचना देखील संबंधित कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांना देण्यांत याव्यात असेही सुचविण्यांत आले.

वरील चर्चा झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याचा ठराव पारित करण्यांत आला.

<u>कार्यक्रम बाब क्र.४ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात ठेकेदारांची नोंदणी करण्याच्या नियमांत करावयाच्या सुधारणा.</u>

त्यावेळच्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडे ठेकेदारांच्या स्वतंत्र नोंदणीची आवश्यकता लक्षांत घेऊन मंडळाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, १९९२ रोजी झालेल्या ५८ व्या सभेत ठेकेदारांच्या नोंदणी नियमांना मान्यता देण्यांत आली होती, असे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सांगून त्यानंतर ५-६ वर्षात झालेली भाववाढ लक्षात घेता, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २० एप्रिल, १९९८ रोजी शासनाकडे नोंदणीकृत ठेकेदारांच्या नोंदणी नियमामध्ये केलेल्या सुधारणा लक्षात घेता, त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नोंदणी नियमामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून त्या अनुषंगाने ही कार्यक्रम बाब सादर केल्याचे सांगितले. त्याच बरोबर मागील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सभेत वर्ग-१ व वर्ग-२ मधील स्थापत्य ठेकेदारांमध्ये आणखीन २ - अनुक्रमे रु.१० कोटी पर्यंतची कामे घेऊ शकतील असे व रु.२५ कोटी पर्यंतची कामे घेऊ शकतील असे-वर्ग निर्माण करण्याची आवश्यकता असण्याबाबत देखील चर्चा झाली होती, त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सांगितले.

या प्रस्तावाबाबत अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सुचविले की वर्ग-२ व वर्ग-१ मध्ये २ वेगळ्या वर्गाची निर्मिती न करता एकाच वर्गाची निर्मिती करावी, त्याच प्रमाणे वर्ग-३, वर्ग-४, वर्ग-५ व वर्ग-६ या खालच्या वर्गामधील त्यांच्या क्षमतेच्या ज्यापटीत कमीत कमी पत, सरासरी वार्षिक उलाढाल, हाती असलेल्या कामाची रक्कम ठरविली आहे त्याच प्रमाणामध्ये वर्ग-२, नव्याने निर्माण करण्यांत यावयाचा वर्ग-१ अ, व वर्ग-१ यांच्या देखील क्षमता ठरविण्यांत याव्यात तसेच नोंदणी शुल्क सुध्दा त्या त्या प्रमाणात ठरविण्यांत यावेत. असेही अपर मुख्य सचिव यांनी सुचविले.

मा.मंत्री महोदयांनी याबाबत असे सुचविले की अपर मुख्य सचिवांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन खालीलप्रमाणे बदल करण्यांत यावेत :-

| वर्ग | कंत्राटदारांची काम करण्याची क्षमता (रु.लाख) | कमीत कमी पत (रु.लाख) | गेल्या तीन वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल (रु.लाख) | चालू वर्षातील हाती असलेल्या कामाची रक्कम.(रु.लाख) | नोंदणी शुल्क रु.मध्ये. | नोंदणी मंजूरीसाठी सक्षम अधिकारी. | नोंदणीसाठी सक्षम अधिकारी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| वर्ग-१ | अमर्याद. | २५० | ५०० | ७५० | ३०,०००/- | स.स.(तां) | अ.अ.(मु.) |
| वर्ग-१अ | २००० | २०० | ४०० | ६०० | २०,०००/- | स.स.(तां) | अ.अ.(मु.) |
| वर्ग-२ | ७५० | ७५ | २०० | ३०० | ९,०००/- | स.स.(तां.) | अ.अ.(मु.) |
| वर्ग-३ | ३०० | ३० | ९० | १५० | ७,५००/- | मु.अ. | मु.अ. |
| वर्ग-४ | १५० | १५ | ६० | ८० | ६,०००/- | मु.अ. | मु.अ. |
| वर्ग-४ब | ९० | ९ | ४० | ६० | ५,०००/- | अ.अ. | का.अ. |
| वर्ग-५ | ५० | ५ | २५ | ३० | ४,०००/- | अ.अ. | का.अ. |
| वर्ग-६ | १५ | २ | ७.५ | १० | २,०००/- | अ.अ. | का.अ. |
| वर्ग-७ | ७ | १ | १.५ | ३ | १,०००/- | का.अ. | का.अ. |
| **(ब) विद्युत व यांत्रिकी कामे.** | | | | | | | |
| अ. | अमर्याद | १५ | ५० | १०० | ५,०००/- | स.स.(तां.) | अ.अ.(मु.) |
| ब. | ५० | १० | २५ | ५० | ३,०००/- | मु.अ.(संबंधित) | मु.अ.(संबंधित) |
| क. | २५ | ५ | १० | २५ | २,०००/- | अ.अ. | का.अ. |
| ड. | १० | २.५ | ५ | १० | १,०००/- | अ.अ. | का.अ. |
| ई. | २ | ०.५० | १ | २.५ | ५००/- | अ.अ. | का.अ. |

विद्युत व तांत्रिक कामांच्या बाबतीत प्रस्तावित केल्याप्रमाणेच बदल मंजूर करण्यांत आले व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

**'' ठराव''**

ठराव करण्यांत येतो की, कंत्राटदाराच्या नोंदणी संबंधित नियमांत सुधारणा तसेच नवीन वर्ग-१ अ निर्माण करुन सध्याच्या नोंदणीकृत कंत्राटदाराच्या निविदा भरण्याच्या क्षमतेत वाढ करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मान्यता देत आहे. यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी / सूचना निर्गमित करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिव (तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी शहरातील कार्यालयासाठी इमारत व अधीक्षक अभियंता,यांचे निवासस्थान बांधणेबाबत.**

कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी अशी माहिती दिली की, ही बाब प्राधिकरणाच्या गेल्या बैठकीत चर्चेसाठी आली होती आणि त्या वेळी ठरल्यानुसार या योजनेच्या अंदाजपत्रकाची किंमत खाजगी आर्कीटेक्टकडून तपासून घेण्यात आली आहे.

या कामाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत काय या मा.राज्यमंत्री महोदयांच्या विचारणेवर मुख्य अभियंत्यांनी खुलासा केला की,निविदा मागविण्यात आल्या आहेत त्या महिनाअखेर प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. तद्नंतर स्वीकृती बाबतची पुढील कार्यवाही व्हावयाची आहे.

सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी असा मुद्दा मांडला की, यापूर्वी प्राधिकरणाने केलेल्या अंदाजपत्रकात काही तरतुदी ठोक (लंपसम) स्वरुपात केलेल्या आहेत त्यात आता वाढ झालेली आहे. प्रधान सचिव,वित्त यांनी या अंदाजपत्रकात सुमारे १४ लाख म्हणजे २०% वाढ झालेली आहे, त्याचे कारण काय या विचारणेवर मुख्य अभियंत्यांनी असा खुलासा केला की, आर्कीटेक्टने आपला स्वत:चा प्लॅन दिला आणि त्यातील तदतुदींनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार सर्व तपशीलासह किंमत काढण्यात आली आहे व त्यामुळे किंमतींत वाढ झालेली आहे.

या एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ किती आहे या मा.राज्यमंत्री महोदयांच्या विचारणेवर १२४४ चौ.मीटर किंवा १२५०० चौ.फूट आहे असे सांगण्यात आले. व या कामाचा ढोबळ खर्च दर चौरस फूटास ७५० ते ८०० च्या दरम्यान पडतो ज्यांत अंदाजपत्रकाच्या तरतुदीनुसार प्राधिकरणाच्या १७.५०% चार्जेसचाही समावेश आहे,असे सांगण्यांत आले. केवळ निविदेच्या किंमतीचा विचार केल्यांस ७३ लक्ष रु.खर्चांवर साधारणत: दर चौरस फूटास ६०० रु.दर पडतो अशी माहिती कोकणच्या मुख्य अभियंत्यांनी दिली.

त्यावर मा.राज्यमंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, त्यांच्या माहितीनुसार खाजगी व्यक्ती वा बिल्डर चांगल्या प्रकारच्या बांधकामाच्या दर्जासह उत्तम प्रकारची इमारत ६०० रुपये दर चौरस फूट या दरात देऊ शकेल अशी त्यांची माहिती आहे . या संदर्भात मा.मंत्री महोदयांनी असे ध्यानांत आणून दिले की, आकडेवारी जरी काहीही दाखवीत असली तरी अशा कामांच्याबाबत लोकांचे अभिप्राय काय आणि सरकारी कामे महाग असतात असे कां म्हटले जाते याचाही विचार करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. या संदर्भात त्यांनी आपला स्वत:चाही अनुभव सांगितला.

आपण या आधी व्यक्त केलेल्या दरानुसार तयार इमारत निश्चितपणे मिळू शकेल व त्यात जमिनीच्या खर्चांचा अंतर्भाव असेल आणि हा दर बिल्टअप क्षेत्रासाठी असेल यावर मा.राज्यमंत्री महोदयांनी भर दिला. याच ठिकाणी त्यांनी असेही प्रतिपादन केले की, यानंतर रत्नागिरी शहराची होणारी वाढ रेल्वे स्टेशनच्या आसपास असणार आहे म्हणून आपण या कार्यालयासाठी रेल्वे स्टेशनच्या आसपास इमारत बांधावयाचा वा विकत घ्यावयाचा विचार करावा .

कार्यवाही
__________
उ.अ.(समन्वय)

तसे असले तरी सध्या या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत त्या स्वीकारण्यात येऊ नयेत असे क्षेत्रीय अधिका-यांना कळवावे अशी सूचना सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी केली. त्यावर मुख्य अभियंता, कोकण विभाग यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, निविदा मागविण्यात आल्या आहेत त्या येऊ दयाव्यात आणि या निविदा जर कमी दराच्या असतील तर त्यांची वरील नमूद बाजारभावाशी तुलना करुन निर्णय घेता येईल.

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरण इमारत विकत घेऊ इच्छिते अशी जाहिरात वृत्तपत्रात देता येईल. ही इमारत रेल्वे स्टेशनच्या जवळपास असावी, इमारतीचे क्षेत्रफळ १२५०० चौ.फूट असावे इत्यादी अटी त्यात घालता येतील.

कार्यवाही
__________
मु.अ.(कोकण)
अ.अ.रत्नागिरी

मा.मंत्री महोदयांनी अशी विचारणा केली की, ज्या आर्कीटेक्टकडून हे अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले आहे ते कोण आहेत व त्यांनाच हे काम का देण्यात आले. यावर कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी खुलासा केला की, बाहिरात देऊन आलेल्या देकारांची छाननी करुन श्री.श्रीकांत पाटील अँन्ड असोसिएट या आर्कीटेक्टकडे हे काम दिले होते. त्यावर मा.मंत्री महोदयांनी अशी सूचना केली की, हा प्रस्ताव सध्या बाजूला ठेवावा. तसेच त्यांच्या प्लॅनमध्ये

आवश्यक ते बदल करावे आणि एकाच आर्कीटेक्टकडे विचारणा न करता कोल्हापूरच्या बेरी या आर्कीटेक्टसह ३-४ जणांकडून प्रस्ताव घ्यावे . तसेच इमारत विकत घेण्याबाबतची जी सूचना करण्यात आली आहे त्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी त्यांनी सूचना केली. त्या संदर्भात मा.राज्यमंत्री महोदयांनी दरम्यानच्या काळात प्राप्त झालेल्या निविदा कमी दरात असतील तर त्यांचाही विचार होऊ शकेल असा अभिप्राय व्यक्त केला.

कार्यक्रम बाब क्र.६:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक परिस्थिती

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी कार्यक्रम बाबीत समाविष्ट मुद्यांची माहिती दिली. त्यांनी असे स्पष्ट केले की, अर्थसंकल्पबाहय मार्गांने जो निधी उभारावयाचा आहे, त्या संदर्भात शासनाने परतफेडीची व व्याज भरण्याची हमी घेऊन ५०० कोटी रुपयांच्या उभारणीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अनुमती दिली आहे. नूकतेच ३५० कोटी रुपयांच्या उभारणीसाठी कर्जरोखे काढण्यात आले आहेत व रु.५०० कोटीपर्यंत जमा झालेली रकम ठेवून घेण्यात येणार आहे. कर्जरोख्याची शेवटची तारीख दि.२८ सप्टेंबर १९९८ रोजी असून, आजवर १७० कोटी रुपयांचा भरणा झालेला आहे व संपूर्ण रकमेचा भरणा होईल अशी त्यांना आशा आहे.

निधीची उर्वरित गरज भागविण्याबाबत नियोजन काय अशी विचारणा मा.मंत्री महोदयांनी केली. तसेच आता नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी निधी कसा उभारावा लागणार हेही पहावे लागेल असा मा.मंत्री महोदयांचा मुद्या होता. त्यावर सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी स्पष्ट केले की, या आधी उभारलेल्या कर्जरोख्याव्दारे २९९ कोटी रुपयांची रकम प्राधिकरणाला प्राप्त आहे तसेच आता जी ५०० कोटी रुपयांच्या उभारणीची शक्यता आहे त्यातूनही काही रकम नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध करुन देता येईल. या शिवाय यापुढे जशी निधीची गरज लागेल तशी पुन्हा: कर्जरोखे काढण्याबाबत शासनाची अनुमती मागावी लागेल.

या संदर्भात मा.मंत्री महोदयांनी एक महत्वाचा मुद्या नजरेस आणला की, कर्जरोखे काढण्यासाठी शासनाने किती रकमेची हमी घ्यावी याबाबत जी काही मर्यादा ठरविण्यात आली आहे ती मर्यादा आता जवळ-जवळ संपलेली आहे. तेंव्हा यापुढे कोणती उपाययोजना करावी लागेल याचा विचार करणे गरजेचे आहे.

मा.राज्यमंत्री महोदयांनी अशी माहिती दिली की, ऑस्ट्रेलियातील एक वित्तीय संस्था बँक गॅरेंटीच्या हमीवर ८% व्याजाने निधी उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. त्यावर ही रकम डॉलर ऐवजी भारतीय चलनात दिली जाणार आहे काय अशी विचारणा प्रधान सचिव,नगर विकास यांनी करता, मा.राज्यमंत्री महोदयांनी होकारार्थी उत्तर दिले. तसेच याबद्दल अधिक विचार करावयाचा असेल तर अधिक माहिती प्राधिकरणापुढे ठेवली जाईल असेही स्पष्ट केले.

एवढया मोठया रकमेची बँक गॅरेंटी कोण देईल याबाबत सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी साशंकता व्यक्त केली. अशा त-हेने जर आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकले तर त्यातील व्याजाचा दर खूपच कमी आहे हा मुद्या ध्यानांत घ्यावा असे सुचविण्यात आले. तेंव्हा मा.मंत्री महोदयांनी असा मुद्या मांडला की, जी बँक अशा कर्जांसाठी हमी देईल ती त्या हमीवरसुध्दा काहीतरी दर लावेल आणि तो दर व्याजाच्या दरामध्ये समाविष्ट करावा लागेल. या संदर्भात असाही मुद्या मांडण्यात आला की, व्याजाचा दर ११% पर्यंत स्वीकारार्ह असेल तर कदाचित निधी उपलब्ध करुन देणा-या वित्तीय संस्था स्वत: बँक गॅरेंटी मिळवून देतील.

करमुक्त कर्जरोखे उभारणीबाबत सुध्दा काही शक्यता आहे तेंव्हा ही बाब तपासून घ्यावी असे प्रधान सचिव,वित्त, यांनी सांगितले. या संदर्भात मा.मंत्री महोदयांनी एक गंभीर मुद्या उपस्थित केला. एखादया वैयक्तिक अधिका-यावर टीका करण्याचा उद्देश नाही, पण विविध निमशासकीय यंत्रणा कर्जरोख्याव्दारे निधी उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्या संदर्भात अर्थ विभागाकडून अधिक सुसूत्रता आणण्याची गरज आहे असा त्यांचा मुद्या होता. त्यांनी असे ध्यानांत आणून दिले की, यापूर्वी जेंव्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कर्जरोखे काढले गेले होते तेंव्हा सुरुवातीस व्याजाचा दर कमी ठेवायचा विचार होता व त्या वेळी कमी व्याजाच्या दराने पैसा मिळण्याची शक्यताही होती. तथापि,

त्यावेळी राज्य वीज मंडळाकडून जे कर्जरोखे काढले जात होते त्या कर्जरोख्या संदर्भात आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्जरोख्या संदर्भात आयोजक म्हणून एकच वित्तीय संस्था काम करीत असताना, तिने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला एक तर व वीज मंडळाला दुसरा सल्ला दिला व परिणामी प्राधिकरणाला व्याजाचा अधिक दर देणे मान्य करावे लागले.

ज्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला ९% व्याजाने (करमुक्त) कर्जरोखे काढता येतील असे वाटले होते तेंव्हा प्रत्यक्षात ११% व्याजाचा दर (करमुक्त) दयावा लागला. तेंव्हापेक्षा आता बाजारात मंदी आहे आणि म्हणून या कर्जरोख्यांसाठी ११% पेक्षाही कमी व्याज दर लावणे शक्य होते असा मा.मंत्री महोदयांनी अभिप्राय व्यक्त केला. त्यावर सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी असे स्पष्ट केले की, बाजारात मंदी आहे हे मर्यादित अर्थाने खरे असले तरी बँकेने आपल्याकडे ठेवीच्या प्रमाणात किती रोख रकमेचा साठा ठेवणे (सी.आर.आर.) रिझर्व बँकेने बंधनकारक केलेले असते त्यामध्ये २% नी अलिकडे वाढ केलेली आहे. म्हणून बँक इतरत्र गुंतवू शकेल अशी रक्कम कमी होते.

आता १४.५०% दराने (सहामाही) वा १५%(वार्षिक) दराने जे कर्जरोखे काढले आहेत त्यामध्ये ३०% आयकर वजा केल्यास हा दर साधारणपणे १०% च्या आसपास येईल व बँकांसारख्या वित्तीय संस्थाच्या बाबत हा आयकर २०% ते २५% धरल्यास तो आणखी थोडा जास्त होईल म्हणजे हा दर पूर्वीच्या ११% च्या आसपासच राहील अशी माहिती देण्यात आली.

त्यावर मा.मंत्री महोदयांनी असे स्पष्ट केले की, इतक्या किचकट आकडेवारीची यथार्थ कल्पना सर्व सदस्यांना येणे शक्य नसल्याने ते एवढेच सांगू इच्छितात की, संबंधित अधिका-यांनी प्राधिकरणाचा व शासनाचा पैसा कसा वाचविता येईल हे पहावे. त्यांनी यावरही भर दिला की, कर्जरोखे उभारणीच्या संदर्भात जे आयोजक आपण नेमतो त्यामध्ये नवीन लोकांना/संस्थांनाही संधी दिली पाहिजे व याबाबत कोणी मक्तेदारी आणू पहात असेल तर तीही मोडून काढली पाहिजे . या संदर्भात मा.राज्यमंत्री महोदयांकडे जा प्रस्ताव आलेला होता त्याचा त्यांनी ओझरता उल्लेख केला.

आहे या परिस्थितीत सध्या तरी निधी उभारणीच्याबाबत आश्वासक असे काही दिसत नाही असा सूर दिसून आला. त्यावर मा.मंत्री महोदयांनी असा निष्कर्ष काढला की, ग्रामीण योजनांसाठी सुरुवातीस जी २००० कोटी रुपायांचे तूट दाखविलेली आहे, त्यापैकी नवीन कर्जरोख्याव्दारे ५०० कोटी रुपयांची उभारणी केल्यास १५०० कोटी रुपयांची तूट शिल्लक राहील व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी ७००-७५० कोटी रुपये जे उभारावयाचे आहेत त्यासाठी या आधी उभारलेली कर्जरोख्यांची ३०० कोटी रुपये रक्कम वापरली तर तिकडे ४५० कोटी रुपयांची तूट राहील. म्हणजेच एकूण १९००-२००० कोटी रु.तूट येऊ शकेल म्हणून इतर कोणते मार्ग उपलब्ध आहेत हे पहावे लागेल.

सदस्य श्री.आशिष कुलकर्णी, यांनी अशी माहिती दिली की, बीओटी तत्वावर काही शहरांच्या योजना हाती घेण्याजोग्या आहेत. काही वित्तीय संस्था अशा प्रकल्पासाठी इच्छुक आहेत.

कार्यवाही
सदस्य
श्री.आशिष
कुलकर्णी.

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी अशी सूचना केली की, ज्या व्यक्ती वा संस्था असा प्रस्ताव देऊ इच्छित असतील त्यांनी ते सादर करावेत. म्हणजे त्यावर विचार करता येईल. मा.राज्यमंत्री महोदयांनी अशा प्रस्तावांचा राज्य शासन स्वागतच करेल असे सांगितले.

कार्यवाही
अ.अ.(समन्वय)

मा.मंत्री महोदयांनी अशी माहिती दिली की, कृष्णा खोरे प्रकल्पामध्ये "यापुढे हाती घ्यावयाच्या कामांबाबत कामे पूर्ण झाल्यावर मागाहून पैसे दिले जातील आणि "आता फक्त १४% व्याज दिले जाईल" या अटीवर १५ कोटी सारख्या किंमतीची कामे दिली जात असून, अशा कामांसाठी सुध्दा कंत्राटदारांची झुबंड लागली आहे. तेंव्हा अशी पध्दत पाणी पुरवठा योजनांसाठी सुध्दा अंगीकारण्याजोगी आहे असा त्यांचा अभिप्राय होता. अशी पध्दत नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी निश्चितपणे अवलंबून पहाण्यासारखी आहे असे सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी विषद केले. त्यावर मा.मंत्री महोदयांनी अशी सूचना केली की, ही बाब एक धोरण म्हणून स्वीकारावयास हरकत नाही व अशी एखादी आकर्षक स्वरुपाची योजना मांडली गेली आणि "याबाबत आपण नेमके या कंत्राटदारांकडून काय अपेक्षा करतो हे स्पष्ट करणा-या " पध्दतीने कामे हाती घेण्याजोगी आहेत.

याच संदर्भात पुणे, कोल्हापूर अशा सारख्या शहरांच्या मोठया योजनांबाबत खाजगीकरणाच्या मार्गातून प्रकल्प राबविण्याचे प्रयत्न होत असल्याची माहिती कोकणच्या मुख्य अभियंत्यांनी दिली.

## कार्यक्रम बाब क्र.७:-प्राधिकरणातील गुण नियंत्रण कक्षाच्या कामाबाबत.

या कार्यक्रम बाबीवर चर्चा सुरु होताना प्रधान सचिव(व्यंय) यांनी असा मुद्या मांडला की, प्रपत्र ६ मध्ये काही पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव आहे. याशिवाय मुख्य अभियंत्यांचे पद निर्माण करावे असाही विचार दिसत असल्याने अशा पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावासही राज्य शासनाची अनुमती लागेल.

त्यावेळी अध्यक्षांच्या अनुमतीने मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी अशी माहिती दिली की, कार्यक्रम बाब क्र.७ मध्ये फक्त गुणनियंत्रण कक्षाच्या आजवरच्या कामागिरीबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे. तो सादर करण्याबाबत यापूर्वीच्या बैठकीत सूचना देण्यात आली होती आणि प्रपत्र ६ मध्ये उल्लेख केलेल्या व इतर काही पदांच्या निर्मितीचा समावेश कार्यक्रम बाब क्र.१३ मध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे गुणवत्ता नियंत्रण कक्षाच्या कामगिरीबाबत चर्चा करताना पदांच्या निर्मितीची विचारणा करण्याची आवश्यकता नाही असे वाटते.

दरम्यान सदस्य श्री.पडळकर, यांनी असा मुद्या मांडला की, कार्यक्रम बाब क्र.७ व १३ मध्ये कामाच्या वाढत्या प्रमाणाचा उल्लेख आहे. तथापि, या वाढत्या कामाच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यालये, पदे, स्टाफ उपलब्ध आहे किंवा नाही हा विचार व्हावयास हवा. याबाबत स्पष्टपणे कोणीही बोलत नाही अशी त्यांची माहिती त्यांनी सांगितली. त्यांच्या या मुद्याला पाठींबा देत सदस्य श्री.माधव कुलकर्णी,यांनी केवळ नवीन स्टाफचाच विचार करुन चालणार नाही तर इतर काय अडचणी आहेत, वाहने उपलब्ध आहेत का याचा विचार होण्याची आवश्यकता दर्शविली. सदस्य श्री.पडळकर, यांनी अनेक ठिकाणी जुन्याच २०-२२ वर्षांपूर्वीच्या गाडया वापराव्या लागत आहेत, त्यामुळे क्षेत्रीय अधिका-यांची कुचंबणा होत आहे असे सांगितले. त्यावर प्रधान सचिव(व्यंय) यांनी असा उल्लेख केला की, शासकीय नियमानुसार एखादे वाहन १० वर्षे वापरात असेल वा २ लाख ५० हजार कि.मी. प्रवास झाला असेल तर ती वाहने निर्लेखित करण्याबाबत तरतूद आहे. त्या दृष्टीने कार्यवाही करण्यांत येणार असेल तर करण्यास हरकत नाही. सदस्य श्री.पडळकर,यांनी सर्व नियमांचे पालन होऊनच नवीन वाहने उपलब्ध करुन देण्याच्या गरजेवर भर दिला.

कर्मचा-यांच्या पद निर्मितीचा प्रश्न असो वा नवीन वाहने उपलब्ध करुन देण्याबाबतची बाब असो याबाबत वित्त विभागांचा विरोध नाही पण शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करणे व आवश्यक तिथे शासनाची अनुमती मिळविणे ही कार्यपध्दती अनुसरण्यात यावी असे मत प्रधान सचिव(व्यय) यांनी मांडले. सदस्य श्री.नवलेपाटील यांनी आवश्यक त्या प्रमाणात कर्मचा-यांची पदे उपलब्ध करुन देण्यावर भर दिला.

तथापि,मा.मंत्री महोदयांनी सध्या या कार्यक्रम बाबीमध्ये गुणवत्ता नियंत्रण कक्षाच्या कामाबाबत आणि संबंधित बाबींच्यावरच बोलावे व इतर बाबीवर सध्या चर्चा करु नये असे आदेश दिले.

अशा प्रकारे या कार्यक्रम बाबीवरील चर्चा संपली.

## कार्यक्रम बाब क्र.८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी.

सदस्य सचिव (वि.व प्र.) यांनी माहे मार्च १९९८ अखेर विविध शिर्षावरील प्राधिकरणाची स्थानिक स्वराज्य संस्थाकडे असलेल्या थकबाकीसंबंधिची कार्यक्रम बाब सविस्तर पणे सभेपुढे मांडली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या थकीत रक्कमा न भरण्याच्या प्रवृत्तीमुळे सन १९९६-९७ पेक्षा सन १९९७-९८ मध्ये रुपये ९३.७२ कोटीने स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकीत रकमेत वाढ झाली व ती ३१ मार्च १९९८ ला रु. ४९५.३३ कोटी इतकी झाल्याचे त्यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना श्री.सुरेश पटवर्धन,सदस्य यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांकडील पाणी बिलाच्या थकीत रकमेत ४० टक्के रक्कम विलंब आकाराची असते.करिता या विलंब आकारासाठी कमाल मर्यादा घालणे आवश्यक आहे. त्यावर श्री.माधव कुलकर्णी,सदस्य यांनी विलंब आकार माफ करण्याबाबत सूचित केले. यावर सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी प्राधिकरणाच्या अधिनियमात तशी तरतूद नसल्याचे स्पष्ट केले. मा.अध्यक्षांनी विलंब आकार माफकरता येणार नाही असे स्पष्ट केले.

श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य यांनी नगरपालिकांना अनुज्ञेय असणा-या महागाई भत्त्यातून जास्तीत जास्त रक्कम थकबाकीपोटी वळती करण्याबाबत सुचित केले. त्यावर श्री.नंदलाल, प्रधान सचिव, नगर विकास विभागयांनी खुलासा केला की, नगर विकास विभागाकडून जेवढे शक्य आहे तेवढी कपात थकबाकी पोटी करण्यांत येते.

अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी स्पष्ट केले की, काही नगरपालिकांकडे वीजेची देयके देण्यासाठी पैसा नाही, उदा.अहमदनगर नगरपालिका, म्हणून वाढती थकीत रक्कम थांबविण्यासाठी योजना हस्तांतरण करणे हाच एक मार्ग आहे. जिल्हा परिषदांकडील थकीत रक्कम वसुलीसाठी जिल्हा परिषदांना देय असणा-या अनुदानातुन कपात करण्यासाठी संबंधित कक्षांना सूचना देण्यांत आल्या आहेत व जानेवारी,९९ पर्यंत कपात होऊ शकेल.

श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य ,यांनी खुलासा केला की, नगरपालिकांच्या योजनांसाठी घेतलेल्या कर्जांची परतफेड प्राधिकरणालाच करावी लागते. त्यामुळे योजनावरील निधी कर्जांच्या परतफेडीसाठी वळवावा लागतो. यावर मा.अध्यक्षांनी कर्ज घेते वेळी करारनाम्यातच नगरपलिकेने संबंधित वित्त संस्थांना कर्जांची परतफेड करावी अशी अट घालावी असे स्पष्ट केले. तसेच सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी कर्जासाठी शासनाने हमी परस्पर नगरपालिकांनाच दयावी असे सुचित केले. परंतु असे करता येणार नाही असे श्री.राजेंद्र सिंग,प्रधान सचिव,वित्त विभाग,यांनी सांगितले.

नगर विकास विभागानी विविध प्रकारच्या अनुदानातून थकीत रकमेपोटी कपात करुन प्राधिकरणास सहकार्य करावे ह्या चर्चेवर श्री.नंदलाल, प्रधान सचिव,नगर विकास विभाग,यांनी सहेतुक अनुदान व दहाव्या वित्त आयोगानी खास शिफारस केलेल्या अनुदानातून प्राधिकरणाच्या थकबाकीपोटी कपात करणे शक्य नाही असा खुलासा केला व नगरपालिकांकडील थकबाकी वसुलीसाठी पाणी कपातीसारखी कठोर कार्यवाही करावी असे सुचित केले. अशा प्रकारे मागे काही नगरपालिकां विरुध्द कार्यवाही केली असता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करुन अशा कार्यवाहीस प्रतिबंध आणण्यांत आले होत असे सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी निदर्शनास आणून दिले.

मा.अध्यक्ष यांनी स्पष्ट केले की, नवीन योजना पूर्ण झाल्यावर त्रिपक्षीय तपासणी करुन योजना त्या संबंधित नगरपालिकेस हस्तांतरित कराव्यात व जोपर्यंत नगरपालिका त्या ताब्यात घेत नाहीत तोपर्यंत त्या योजनांव्दारे पाणी देऊ नये. तसेच मा.अध्यक्षांनी नगरपालिकांच्या अडचणी बद्दल उपाय सुचवावेत असे सुचित केले.

मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे, यांनी खुलासा केला की, काही संस्था बी.ओ.टी. पध्दतीवर पाणी पुरवठा योजना चालवायला तयार आहेत. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी याच्यावर विचारविनिमय करणे आवश्यक आहे असे सुचविले.

वरीलप्रमाणे चर्चा होऊन थकबाकी वसुली संबंधाने सर्व स्तरावरुन अधीक प्रयत्न करावेत असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.९:-सन १९९६-९७ चा वार्षिक प्रशासकीय अहवाल व**
**कार्यक्रम बाब क्र.१७:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन १९९६-९७ च्या वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मंजूरी बाबत.**

अपर मुख्य सचिव,नगर विकास विभागाचे प्रधान सचिव व वित्त विभागाचे प्रधान सचिव(व्यय) या सर्वांनी असे दाखवून दिले की, लेखा परिक्षण अहवालात असे काही मुद्दे आहेत की, आजवरची कार्यवाही अनेक वर्षे प्रलंबित आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेखाविभागाने या आकडेवारीचा मेळ घालून (Reconcile ) त्यास महालेखापालांची अनुमती मिळविणे आवश्यक हाते. या मुद्यावर अखेर मा.मंत्री महोदयांनी असा निर्णय दिला की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा प्रशासकीय व लेखा परिक्षण अहवाल हा

कार्यवाही
...त.मु.ले.अ.

डिसेंबर,१९९८ मध्ये व्हावयाच्या विधान मंडळाच्या पुढील अधिवेशनात ठेवावयाचा असल्याने अजून काही वेळ शिल्लक आहे आणि दरम्यान हा अहवाल विधी मंडळापुढे ठेवण्यापूर्वी जास्तीत-जास्त मुद्यांवर कार्यवाही होउन आक्षेप दूर करण्याबाबत अधिकाधिक प्रयत्न केले जावेत. डिसेंबर,१९९८ मध्ये व्हावयाच्या नागपूर येथील अधिवेशनापूर्वी होणा-या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ही कार्यक्रम बाब पुन्हा विचारांत घेता येईल. चर्चेच्या अनुषंगाने १९९७-९८ च्या लेख्यांना अंतिम स्वरुप देण्याबाबतही सर्व प्रयत्न करण्यांत यावेत, अशी सूचना अपर मुख्य सचिवांनी केली.

**कार्यक्रम बाब क्र.१० :- प्राधिकरणातील विभागीय लेखापालांना पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे कार्यरत असलेल्या विभागीय लेखापालांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बैठकीपुढे विचारार्थ जी कार्यक्रम बाब ठेवण्यांत आली होती, त्यातील प्रस्तावाच्या संदर्भात प्रधान सचिव (व्यय) यांनी असे दर्शविले की, हा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यावर आवश्यकतर ५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीच्या संदर्भातील असंगती वर विचार करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या समितीशी विचार विनिमय करुन, त्यावर योग्य तो निर्णय घेता येईल.

त्यानुसार हा प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर करण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाची संमती देण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.११ :- केंद्रीय कार्यालयातील सहाय्यकांची पदे प्रथम लिपिक पदावर रुपांतर करणेबाबत.**

या कार्यक्रम बाबीतील विषयावर चर्चा होउन अध्यक्ष महोदयांनी असे आदेश दिले की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव, वित्त विभागाचे प्रधान सचिव (व्यय) आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव (प्रशासन व अर्थ) यांनी एकत्र बसून या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करावी. या ३ अधिका-यांच्या चर्चेनंतर हा प्रस्ताव गुणवत्तेच्या दृष्टीने मान्य होण्याजोगा असेल, तर त्यानुसार हा प्रस्ताव शासनाच्या विचारार्थ सादर करण्याचे अधिकार सदस्य सचिव (प्रशासन व अर्थ ) यांना देण्यांत येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :- सिमेंटचा पुरवठा विभागवार वितरण व्यवस्था.**

पाटबंधारे खात्याच्या दर करारातील दरानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सिमेंटचा पुरवठा करण्यासाठी ही कार्यक्रम बाब तयार करण्यांत आलेली असून त्यामध्ये पूर्वी सूचित केल्याप्रमाणे, राज्यातील व राज्याबाहेरील सर्व सिमेंट कंपन्याशी पत्रव्यवहार करुन ज्या कंपन्या रु.१६५०/- दर प्रतिटन या दराने सिमेंट द्यावयास तयार आहेत. त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यांत आल्याचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सांगितले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वेगवेगळ्या मंडळांसाठी त्या त्या कंपन्यांच्या कारखान्यापासून किती अंतर आहे, याचा विचार करुन तसेच मूळ दरावर लागू असलेले इतर कर यांचा विचार करुन ज्या कंपन्यांकडून सिमेंट घेणे स्वस्तात पडते, त्यानुसार प्रस्ताव सादर केला आहे, असे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सांगितले. सी.सी.आय.चे कारखाने आंध्र प्रदेश व कर्नाटकात असून देखील या कंपनीबरोबर करार करण्यास हरकत नाही, कारण ही केंद्र शासनाची कंपनी आहे, असे अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सांगितले. मा.राज्यमंत्री यांनी ठराव मंजूर करण्यापूर्वी असे सुचविले की, नर्मदा सिमेंट ही कंपनी अे.सी.सी. व सी.सी.आय. या कंपनीच्या दरात रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये सिमेंटचा पुरवठा करण्यास तयार आहे काय, याबाबत त्यांच्याकडे पुन्हा विचारणा करण्यात यावी व त्यांच्याकडून जसे उत्तर प्राप्त होईल त्या प्रमाणे शक्य असल्यास रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी या कंपन्यांकडून सिमेंट घेण्याचा प्रस्ताव पुढे सादर करावा.

वरीलप्रमाणे खुलासा केल्यानंतर प्रस्तावित केल्याप्रमाणे अे.सी.सी.,एल.अॅड टी., माणिकगड व सी.सी.आय. या उत्पादकांकडून प्रस्तावित करण्यांत आल्याप्रमाणे रु.१६५०/- प्रतिटन या दराने तसेच पाटबंधारे खात्याशी केलेल्या दर करारातील अटी व शर्ती नुसार सिमेंट प्राप्त करुन घेण्याचा ठराव संमत करण्यांत आला.

**कार्यक्रम बाब क्र.१३:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत गुणवत्ता नियंत्रण, दक्षता पथकाची निर्मिती करणे तसेच दैनंदिन तत्वावर योजनांची त्रयस्थ यंत्रणांकडून पहाणी करुन घेणे.**

मुख्य अभियंता(बा.अ.) यांनी कार्यक्रम बाबीतील मुख्य मुद्यांची माहिती दिली. त्यांनी विषद केले की, ३ जून,१९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत या कार्यक्रम बाबीवर चर्चा झाली होती. त्या चर्चेमध्ये विविध सदस्यांनी ज्या सूचना केल्या होत्या, त्यांचा अंतर्भाव करुन ही कार्यक्रम बाब सुधारुन पुन: चर्चेसाठी ठेवण्याचे ठरले होते. त्यानुसार कार्यक्रम बाब सुधारण्यांत आली आहे. तसेच तद्नंतर मा.राज्यमंत्री(पाणी पुरवठा) यांनी सदस्य सचिवांना पाठवलेल्या टिप्पणीत ज्या सूचना केल्या आहेत, त्यांचाही अंतर्भाव करण्यांत आला आहे.

त्यांनी अशीही माहिती दिली की, आधीच्या कार्यक्रम बाबीपेक्षा आता पुढील बदल केले गेले आहेत.

अ) आधी पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव नव्हता, आता आहे.

आ) पाणी पुरवठा विभागाच्या अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता नियंत्रण, दक्षता व त्रयस्थ यंत्रणांकडून पहाणी या बाबी हाताळण्यासाठी केंद्रीय कार्यालयांत मुख्य अभियंत्यांचे एक पद निर्माण करणे.

इ) सध्या गुणवत्ता नियंत्रण पथकाची जी संरचना आहे तिच्या ३ पट संरचना प्रस्तावित केली आहे.

ई) केंद्रीय कार्यालयांत हे काम हाताळण्यासाठी अवर सचिव दर्जाच्या एका पदासह इतर कांही पदांची निर्मिती

उ) दक्षता पथकांतर्गत, अधीक्षक अभियंता यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक महसूल विभागांत एक अशी ६ भरारी पथके निर्माण करणे (सध्या यापैकी एक पथक स्थापन करणे)

ऊ) या एकूण प्रस्तावाप्रमाणे १०९ पदे [illegible], त्यासाठी वार्षिक रु.९० लाखाच्या आसपास खर्च येईल.

त्यांनी असेही स्पष्ट केले की, [illegible] गुणवत्ता नियंत्रण पथकाने सरासरीने दरमहा ६ या गतीने १०३७ योजनांची पहाणी केली. आता [illegible] २२०० टँकरग्रस्त व ४००० बिगर टँकरग्रस्त गावांच्या योजनांची एकाचवेळी अंमलबजावणी होणे [illegible] गुणवत्ता नियंत्रण पथकाच्या बळकटीकरणाची गरज समर्थनीय आहे असे त्यांनी [illegible] सदस्यांनी या मागणीस पाठिंबा दिला.

आजवर गुणवत्ता नियंत्रण [illegible] केले, ते कितपत प्रभावी ठरले अशी मा.राज्यमंत्री(पाणी पुरवठा) यांनी विचारणा केली. [illegible] माहिती कार्यक्रम बाब क्र.६ त आहे असे स्पष्ट करीत मुख्य अभियंता(बा.अ.) यांनी, "[illegible], त्यांत त्रुटी आढळल्याची प्रकरणे १४१ (१३% ) होती, यापैकी ८७ प्रकरणी [illegible], व त्यापैकी ३८ प्रकरणी कारवाई करण्याचे ठरल्यांवर दोषारोपपत्र प्रारुप सादर केले, [illegible], मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, जिल्हा परिषद, सरपंच, बातमीदार इत्यादिंनी [illegible] तक्रारींची चौकशी केली, त्यांत ६०% तक्रारीत तथ्य नव्हते, ४०% तक्रारींत तथ्य होते" [illegible]

कार्यवाही

मु.प्र.अ.

गुणवत्ता नियंत्रण पथकाने त्रुटी, [illegible] सादर केले, दोषारोपपत्रे तयार केली त्यांवर पुढे काय कारवाई झाली, [illegible] केली अशी विचारणा मा.राज्यमंत्री(पाणी पुरवठा) यांनी केली. तेंव्हा ही माहिती [illegible] मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना सांगितल्यांवर ही माहिती निविदा [illegible] असे मा.मंत्री महोदयांनी आदेश दिले.

कार्यवाही

मु.प्र.अ.

गुणवत्ता नियंत्रण पथकांत किती पदे [illegible] निर्माण केली जाणार आहेत, सध्या किती खर्च येतो, पुढे किती येईल अशी विचारणा [illegible]) व प्रधान सचिव(व्यय) यांनी केली. तेंव्हा अशी माहिती दिली गेली की, [illegible] ३८ पदे असून, आणखी ७६ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे. सध्यां वार्षिक [illegible] व ७६ पदासह एकूण १०९ पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावास ९० लाख [illegible] आले. कार्यक्रमाची व्याप्ती कांही काळापुरतीच वाढणार असून, तेवढ्या [illegible] निर्माण करणे आवश्यक आहे, का, इतर कांही मार्ग चोखाळता येईल, याचाही विचार [illegible]

पदांच्या निर्मितीचा विचार ताबडतोब न करता सध्याचीच यंत्रणा अधिक प्रभावी करावी आणि बळकटीकरणाचे मागाहून पहांता येईल अशी सूचना अपर मुख्य सचिवांनी केली. त्यांनी असेही अभिप्राय व्यक्त केले की, सध्या जी (सुमारे) ४० पदे आहेत, त्यांचे गट पाडावे व इतर अशा कांही यंत्रणांतील पध्दतीप्रमाणे त्यांना दरमहा अमुक इतक्या योजनांना (कोटा) भेटी देऊन तपासणी करण्यांस सांगावे. तेंव्हा मुख्य अभियंता(बा.अ.) यांनी असे स्पष्ट केले की, अस्तित्वांतील ३८ पदांपैकी कामांना भेटी देऊन तपासणी करण्यासारखे ४ च वरिष्ठ अभियंत्यांची पदे आहेत.

कार्यवाही
मु.प्र.अ.

तेंव्हा प्राधिकरणाकडे अन्यत्र सर्व ठिकाणी मिळून जी पदे उपलब्ध आहेत, त्यांतून सध्या १० पदे या कामांसाठी उपलब्ध करुन द्यावी अशी सूचना अपर मुख्य सचिवांनी केली.

मा.राज्यमंत्री महोदयांनी (पाणी पुरवठा) सावधगिरीचा इषारा दिला की, या कामासाठी माणसे निवडतांना काळजी घ्यावी. भ्रष्टाचारी अधिकारी अशा ठिकाणी नेमल्यांस त्याचे दुरुपयोग होतात आणि हेच अधिकारी कारवाई करणेऐवजी संबंधितांशी हातमिळवणी व समझोता करतात अशी त्यांची माहिती असल्याचेही स्पष्ट केले.

कार्यवाही
मुख्य अभियंता
(पुणे)

याच संदर्भात मा.मंत्री महोदयांनी(पाणी पुरवठा) पुण्याच्या मुख्य अभियंत्यांना सूचना केली की, तासगांव तालुक्यांतील वायफळ योजनेत पाईप ६ इंच म्हणजे इतके वर टाकले आहेत की, शेतक-यांच्या साध्या नांगराच्या फाळ्याने ते वर आल्याची त्यांना माहिती मिळाली असून त्याबाबतचा अहवाल मुख्य अभियंता(पुणे) यांनी सादर करावा.

अखेरीस असे ठरले की, त्रयस्थ यंत्रणेकडून पहाणी करुन घ्यावयाच्या प्रस्तावांत पदांच्या निर्मितीच्या व तद्नुषंगिक आर्थिक भाराचा प्रश्न येत नसल्याने तेवढ्यापुरता कार्यक्रम बाबीचा भाग मंजूर झाल्याचे समजावे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१४:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी मंजूर केलेल्या अधीक्षक अभियंता इत्यादी कार्यालयासाठी सहाय्यक कर्मचारी वर्ग निर्माण करणे.</u>**

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी दर्शविले की, दि.२ जानेवारी,१९९७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ७० व्या बैठकीपुढे जी कार्यक्रम बाब ठेवण्यांत आली होती, त्यामध्ये उप लेखापालांची २४ पदे अस्तित्वात आहेत, असे जे गृहित धरलेले होते ते चुकीचे होते. उप लेखापालांची फक्त ८ च पदे अस्तित्वात होती. तेंव्हा मंजूर करण्यांत आलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार (Staffing Pattern) २२ परिमंडळ कार्यालयात उप लेखापालांची पदस्थापना करण्याच्या दृष्टीने १४ पदांची निर्मिती करणे आवश्यक आहे.

प्रधान सचिव(व्यय) यांनी असे ध्यानांत आणून दिले की, अलीकडे २ जून, १९९८ रोजी शासनाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत, त्या संदर्भात या पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मंत्रीमंडळापुढे/ मुख्य सचिवांच्या समितीपुढे सादर करावा लागेल. तेंव्हा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, अपर मुख्य सचिवांनी असे विषद केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात ६ मुख्य अभियंते व १२ अधीक्षक अभियंते यांची पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावाला मंत्री मंडळाने ऑक्टोबर ,१९९६ मध्ये जेंव्हा मान्यता दिली तेंव्हा या कार्यालयांना लागणारी अनुषंगिक पदे निर्माण करण्यास प्राधिकरणाला अनुमती देण्यांत आली होती. आणि म्हणून लेखापालांच्या प्रस्तावित १४ पदांच्या निर्मितीसाठी वित्त विभागाची अनुमती घेण्याची गरज नाही, तरीही प्रधान सचिव(व्यय) यांनी आग्रह धरला की, शासनाच्या अलीकडच्या २ जून, १९९८ च्या आदेशानुसार पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदयांनी अशी सूचना केली की, सामान्य प्रशासन विभागाकडे जो अतिरिक्त कर्मचारी वर्ग (हवेली कारकून) उपलब्ध आहे, त्यातील काही जण थेट उप लेखापालांच्या पदांसाठी, वा, त्याहून खालच्या स्तरावरील पदांसाठी निवडता येतील. जेणेकरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांमधून उप लेखापालांची पदे पदोन्नतीव्दारे भरता येतील. असे जर करता आले तर मंत्रीमंडळाकडे हा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्याची गरज राहणार नाही. प्रधान सचिव(व्यय) यांनी ही धारणा पक्की केली.

त्यामुळे असे ठरले की, सामान्य प्रशासन विभागातील अतिरिक्त कर्मचारी कक्षातील व्यक्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील लेखा विभागातील उचित स्तरावर सामावून घेण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांत यावा. याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार करण्याबाबतचे अधिकार सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांना देण्यांत आले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१५:-मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयासाठी श्रेयस चेंबर्स,फोर्ट,मुंबई-१ येथील हुडकोकडून पहिला व तिसऱ्या मजल्यावरील ४०४० व २८०१ चौ.फूट जागा भाडे तत्वावर पुढेही चालू ठेवणेबाबत.</u>**

सदस्य सचिव ( प्रशासन) यांनी ह्या विषयी मागील पार्श्वभूमी स्पष्ट केली.

ह्या जागेसाठी हुडकोने भाडयामध्ये रु.४०/- पासून ते रु.७०/- अशी दर चौरस फूट वाढ सन १९९६ पासून मागितली आहे. तसेच ही संख्या ह्याहीपेक्षा अधिक भाडयाची मागणी इमारत दुरुस्त झाल्यानंतर करण्याची शक्यता आहे. सदर इमारत केंव्हा दुरुस्त होईल हे आता अवगत होत नाही. हुडकोने इमारत दुरुस्तीच्या कालावधीत सुध्दा प्राधिकरणाकडून भाडे मागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्राधिकरणाच्या काही सदस्यांनी श्रेयस चेंबर्स येथील जागा सोडणेबाबत तर, कांही सदस्यांनी सदर जागा, सी.एस.टी. मुंबई रेल्वे स्थानकाजवळ, व मुंबई मध्यवर्ती ठिकाण असल्याने जागा सोडू नये असे मत व्यक्त केले.

चर्चेअंती श्रेयस चेंबर्स येथील पहील्या व तीस-या मजल्यावरील एकूण जागा ( ४०४० चौ.फूट व २८०१ चौ.फू.) प्राधिकरणाने ठेवण्याबाबत, तसेंच जुन्या दराने हुडकोस भाडे देण्याचा निर्णय घेतला. प्राधिकरणाने भाडे तत्वावर भाडेकरु जागा देण्याचे मान्य केले.

प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री, (पा.पु.व स्व.) यांनी असे मत व्यक्त केले की, प्राधिकरणाचे मध्यवर्ती कार्यालय सध्या एक्सप्रेस टॉवर्स (नरिमन पॉईंट) श्रेयस चेंबर्स (सी.एस.टी.,मुंबई, स्टेशनाजवळ ) व सिडको भवन (बेलापूर रोड) असल्याने, गैरसोईचे आहे व म्हणून प्राधिकरणाचे मध्यवर्ती कार्यालय एकाच ठिकाणी आणण्याच्या दृष्टीने, सिडकोभवन व ठाणे या वेगवेगळ्या ठिकाणी न ठेवता, ठाणे या एकाच ठिकाणी असणे सोईस्कर होईल. यासाठी ठाणे येथे अस्तित्वांत असलेल्या प्राधिकरणांच्या इमारतीवर अधिक मजले बांधावेत किंवा दुसरी नवीन इमारत बांधण्याबाबत, प्राधिकरणाने तपास करावा, असेही निर्देश दिले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१६:-प्राधिकरणाच्या कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षांपर्यंत वाढविणेबाबत.</u>**

प्रधान सचिव(व्यय) यांनी असे निर्देशित केले की, राज्य शासनाच्या अखत्यारितील सार्वजनिक उपक्रमातील कर्मचा-यांच्या निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री यांच्या विचारार्थ यावा,असा शासनाने निर्णय घेतलेला आहे आणि त्यांच्या अनुमतीनंतरच राज्यातील सार्वजनिक उपक्रम आपल्या कर्मचा-यांच्या निवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० पर्यंत वाढवू शकतील. त्यावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी असे ध्यानांत आणून दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुरते सांगावयाचे झाल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या निवृत्तीचे वय ६० पर्यंत वाढविण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यांत आला आहे. त्याची २ प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

....१७....

१) शासनाचे सर्व नियम व विनियमन,वेळोवेळीच्या दुरुस्तीसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना आजवर आपोआप लागू करण्यांत आलेले आहेत.

२) पाणी पुरवठा मंडळाच्या निर्मितीच्या वेळी राज्य शासनाच्या नगर विकास विभागात काम करणा-या कर्मचा-यांची सेवा जेंव्हा पाणी पुरवठा मंडळाकडे वर्ग करण्यांत आली तेंव्हा शासकीय सेवकांना ज्या काही सेवाशर्ती लागू केलेल्या होत्या, त्या सेवाशर्ती यापुढेही मंडळाच्या सेवकांनाही लागू रहातील, असे स्पष्टपणे नमूद करण्यांत आले होते. सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी असे ध्यानांत आणून दिले की, ६० वे वर्ष पूर्ण होण्याआधी आता एखाद्या व्यक्तीस निवृत्त करण्यांत आले, तर न्यायालयामध्ये या गोष्टचे समर्थन करणे फार कठीण जाईल.

चर्चेनंतर अखेर असे ठरले की, निवृत्तीचे वय ६० पर्यंत वाढविण्याच्या निर्णयाचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना जो लाभ देण्यांत आलेला आहे, त्या प्रकरणी शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायार्थ ही बाब शासनास सादर करण्यांत यावी.

81est-mk